फोन. न. (2462) 229242,, 229243
फॅक्स नं. (2462) 229574

Phone : (02462) 229242, 229243
Fax (02462) 229574

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
"ज्ञानतीर्थ" विष्णुपूरी.
**नांदेड - ४३१ ६०६.**

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY,**
*"Dnyanteerth" Vishnupuri*
**NANDED – 431 606 (MH.)**

जावक क्रं. शैक्षणिक/परिपत्रक/2011–2012/2201 Date January 3, 2012

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नीत कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

विषय :- कंत्राटी सेवा काळात शैक्षणिक अर्हता धारण करणा-या सहाय्यक प्राध्यापकांना कंत्राटी काळातील सेवा परिविक्षाधीन गृहित धरून पुढे नियमित मान्यता देणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात ज्या अधिव्याख्यात्यांनी कंत्राटी अधिव्याख्याता म्हणून सेवा केलेली आहे आणि त्यांनी कंत्राटी सेवाकाळात शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे. अशा अधिव्याख्यातांच्या बाबतीत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००४/(९७/०४)/विशि-४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक ७ जानेवारी २००५ मध्ये असे उल्लेखीत आहे की, विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या व विद्यापीठ कार्यालयातील तरतुदीप्रमाणे विहित निवड समिती मार्फत निवड झालेल्यांना नियमित वेतन श्रेणीत सामावून घेवून त्यांची नियुक्ती झाल्यापासून त्यांचा दोन वर्षाचा कालावधी परिविक्षाधीन कालावधी समजण्यात यावा.

तसेच, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००४/(९७/०४)/विशि-४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक ३१ मे, २००५ मध्ये कंत्राटी काळात ज्या अधिव्याख्यात्यांनी शैक्षणिक अर्हता पूर्ण केली नाही. त्यांना पुढे ०२ वर्षाकरीता पुर्ननियुक्ती देण्यात यावी व ज्याची पुर्वीच्या दोन वर्ष काळातील सेवा समाधानकारक आहे अशांनाच पुढे दोन वर्षाकरीता पुर्ननियुक्ती दयावी असा उल्लेख करुन परिछेद क्र.०४ मध्ये विद्यापीठ कायदयानुसार विहित समिती मार्फत नियुक्त झालेल्यांनी शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास त्यांना त्वरीत नियमित वेतन श्रेणीत सामावून घ्यावे असे स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांनी सेवा काळात विहित शैक्षणिक अर्हता धारण केल्यास त्यांना त्यांच्या रुजू दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी गृहीत धरुन पुढे त्यांच्या सेवा विद्यापीठ परिनियम १७६(४)(सी) नुसार सेवेत कायम समजण्यात याव्यात व परिनियम १७७(१) नुसार संस्थेने त्यांना सेवेत कायम करणे आवश्यक आहे. तरी उक्त शासन निर्णयानुसार कंत्राटी सेवाकाळात अर्हता धारण केलेल्या सहाय्यक प्राध्यापकांच्या कंत्राटी सेवा परिविक्षाधीन गृहित धरुन पुढे नियमित मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव संस्थेच्या ठरावासह विद्यापीठात विहित कागदपत्रासह सादर करावा, कळावे.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत
**उपकुलसचिव**
शैक्षणिक विभाग